# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :—www.nssmu.org.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.**
पत्र क्र.रासेयो/ ७२० /२०१७—१८
दिनांक : ०६/१२/२०१७

प्रति,

प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सर्व महाविद्यालये,

विषय : राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर आयोजन संदर्भात ......

मा. महोदय/महोदया,

राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमामध्ये विशेष शिबिर उपक्रमास अन्यनसाधारण महत्व आहे. सात दिवस सलग दत्तक गाव/खेडे येथे निवास करून समाज उपयोगी विविध उपक्रम या अंतर्गत राबविले जातात. विशेष शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत नोंद स्वयंसेवकांपैकी ५०% स्वयंसेवक सहभागी होणे अपेक्षित आहे.

शिबिर उपक्रम हा महत्वाचा असल्याने त्याची पूर्वतयारी योग्य रितीने करणे अपेक्षित आहे. साधारण एक महिना आधी विशेष शिबिराची तयारी महाविद्यालयीन स्तरावर सुरू करणे अपेक्षित आहे. शिबिर स्थळ, विद्यार्थी संख्या, दैनंदिन उपक्रम याची माहिती कार्यक्रम समन्वयक यांना शिबिर सुरू होण्यापूर्वी कमीत कमी सात दिवस आधी लेखी स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाने सुचित केल्याप्रमाणे स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत महाविद्यालयाने दत्तक गाव/वस्ती येथे शिबिर घेऊन स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत विविध उपक्रम राबविणे अपेक्षित आहे. महाविद्यालयाने गाव/वस्ती दत्तक घेताना सदरचे ठिकाण हे इतर महाविद्यालयाने दत्तक घेतले नसावे याची दक्षता घ्यावी. संस्था, मंडळ यांचेकडे एकत्रित शिबिर घेतल्याने वरील उद्देश सफल होत नाही. यासाठी प्रत्येक महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत दत्तक गाव/वस्ती हे वेगवेगळे असावे व संबंधित गाव/वस्ती येथे शिबिरार्थींनी निवास करून शिबिर उपक्रम राबविण्यात यावा.

- शिबिराची थीम 'स्वच्छ भारत अभियान' सन २०१९ पर्यंत
  शिबिरासाठी दत्तक घेतलेले गाव/वस्ती ही सन २०१९ पर्यंत बदलु नये व सातत्याने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबविणे. उदा. शौचालय, शोषखडे, सेंद्रीय खत खड्डे, परस बाग विकास, ग्रामस्वच्छता इ.
- शिबिराचे ठिकाणी मुला/मुलींसाठी वेगवेगळी निवासाची व इतर आवश्यक सोयी असाव्यात.
- शिबिर सहभागींमध्ये मुले व मुली एकत्रीत असल्याने महिला कार्यक्रम अधिकारी शिबिर स्थळी निवासी असणे आवश्यक आहे.
- शिबिरासाठी ग्रामपंचायत/ग्रामसेवक यांची लेखी परवानगी घेणे व गावाच्या आवश्यक्यतेनुसार कामाचे नियोजन करावे.
- शिबिर स्थळाजवळील पोलीस पाटील/पोलीस स्टेशन/आरोग्य सेवा केंद्र यांना शिबिराच्या कालावधी विषयी उपक्रमाविषयी लेखी माहिती देणे.

- शिबिरादरम्यान माजी विद्यार्थ्यांचा कमीत कमी सहभाग असावा जेणेकरून नविन विद्यार्थ्यांना नेतृत्व व इतर उपक्रमात सहभागी होण्याची संधी प्राप्त होईल.
- शिबिरादरम्यान मोठया आवाजात ध्वनिक्षेपक (Music System) लावू नये. कार्यक्रमाची गरज असेल तरच ध्वनिक्षेपकांचा उपयोग करावा.
- विविध शासकीय व जनउपयोगी योजनेसंबंधी शिबिर स्थळाजवळील पोलीस पाटील / ग्रामसेवक / सरपंच / पोलीस अधिकारी / वैद्यकीय अधिकारी / समाजसेवक / शासकीय अधिकारी यानां आमंत्रित करून शिबिरार्थींना मार्गदर्शन करावे.
- शिबिरार्थींची राहणी, पेहराव, शिबिरातील वर्तन हे शिबिर स्थळावरील ग्रामस्थांच्या अक्षेपार्ह असू नये.
- शिबिरासाठी काटकसरीने खर्च करावा. हार—फुले—पुष्पगुच्छ / भेटवस्तु यावर खर्च कमी करावा.
- शिबिराच्या सात दिवसांच्या कार्यक्रमाची कार्यक्रम पत्रिका मोठया अक्षरात शिबिरस्थळी लिहलेली असावी.
- शिबिरार्थींची हजेरी घेण्यात यावी व हजेरी पत्रकावर दररोज शिबिरार्थींच्या स्वाक्षऱ्या घेण्यात याव्यात.
- एकाच गावात एकापेक्षा जास्त महाविद्यालयांनी शिबिर आयोजन करू नये. अशा प्रकारच्या शिबिरास विद्यापीठ कार्यक्रम समन्वयक यांची मंजूरी मिळणार नाही याची नोंद घ्यावी.
- शिबिरार्थींनी शिबिरस्थळी शिबिराच्या पहिल्या दिवशी दुपारपर्यंत (दुपारच्या जेवणाच्याआधी) पोहचावे व शिबिराचा समारोप सातव्या दिवशी दुपारच्या जेवणानेतर करावा जेणेकरून जास्तीत जास्त वेळ सामाजिक उपक्रमांना देता येईल.
- मोठ—मोठ्ठे उद्धाटन समारोप समारंभ टाळावेत व जास्तीत जास्त नवे समाजउपयोगी उपक्रम राबवावेत.

राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष शिबिर आयोजन करताना वरील नोंदींची दक्षता घ्यावी व त्यानुसार शिबिर आयोजित करून केंद्र व राज्य शासनाच्या योजने अंतर्गत विविध उपक्रम राबवुन समाज उन्नतीस सहकार्य करावे.

आपला विश्वासु

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रासेयो विभाग